# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## सुधारीत सूचना

**कॉम्प्युटर ॲप्लीकेशन अभ्यास मंडळाची पहिली बैठक** खालील विषयाच्या अनुषंगाने **दिनांक १३-०३-२०१८ रोजी दुपारी ०४:०० वाजता** विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारती मधील **महात्मा ज्योतीबा फुले सभागृहामध्ये** आयोजित करण्यात आली आहे.

कृपया, आपण वर उल्लेख केलेल्या दिनांकारोजी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे.

| | | |
|---|---|---|
| | ][ | |
| संदर्भ क्रं.अ.वि./कॉ.ॲ./अ.मं./२०१७-१८/ | ][ | **कुलसचिव** |
| 7005-7354 | ][ | **आदेशान्वये** |
| दिनांक:-०३-०३-२०१८ | ][ | |

******

प्रति,

१) **मा. विभाग प्रमुख,**
व्यवस्थापनशास्त्र विभाग, विद्यापीठ परिसर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

२) **डॉ. सुचेता यांबल,**
व्यवस्थापनशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

३) **डॉ. परदीप कुमार,**
एम.जी.एम. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,
**औरंगाबाद.**

४) **डॉ. अन्वर अख्तर,**
मिलेनिअम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,
**औरंगाबाद.**

५) **डॉ. अमोल मुरगई,**
आय.सी.ई.टी. मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट,
**वाळूज, औरंगाबाद.**

६) **डॉ. सय्यद अर्शद रझवी,**
बिल गेट्स इन्स्टिट्यूट ऑफ
कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट,
**उस्मानाबाद.**

७) **डॉ. राजीव खरात,**
आर.एस.आय.एम. मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट,
**औरंगाबाद.**

:: २ ::

## * बैठकीचे विषय *

१. **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४० (२) (घ) अन्वये अभ्यास मंडळ त्याच्या सदस्यांमधून एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करण्याबाबत.**

२. ‘महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४० (२) (घ) (दोन) व (तीन) अन्वये अभ्यास मंडळावर तज्ज्ञ व्यक्तींना स्वीकृत करणेबाबत-

२. ऐनवेळेचे काही विषय असल्यास ?

--=**=--

*S*070318/-*

अभ्यास मंडळे. **४०.** (१) परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी एक अभ्यास मंडळ असेल. अभ्यास मंडळ हे विद्यापीठाचे प्राथमिक विद्याविषयक मंडळ असेल.

(२) अभ्यास मंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) संबंधित विषयांतील विद्यापीठ विभागाचा किंवा परिसंस्थेचा प्रमुख :

परंतु, जेथे विषयासंबंधात विद्यापीठ विभाग नसेल त्याबाबतीत, मंडळ आपल्या पहिल्या बैठकीत, त्या विषयातील पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या संलग्न महाविद्यालयामधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी ज्याला मान्यता मिळालेली आहे अशा विभागाच्या प्रमुखास स्वीकृत करील ;

(ख) कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून, किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेले पुढील प्रवर्गामधून नामनिर्देशित केलेले सहा अध्यापक :—

(एक) संबंधित विषयातील विद्यापीठ विभागाच्या पूर्णवेळ अध्यापकांमधून एक अध्यापक ;

(दोन) संबंधित विषयातील पदव्युत्तर अध्ययनक्रम देऊ करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील किंवा पदव्युत्तर केंद्रांमधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापकांमधून दोन अध्यापक ;

(तीन) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विभागप्रमुख नसलेले तीन अध्यापक ;

(ग) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखाच्या गटामधून निवडून द्यावयाचे संलग्न महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील तीन विभाग प्रमुख ;

(घ) अभ्यास मंडळ त्याच्या पहिल्या बैठकीत :–

(एक) कलम ६५ च्या तरतुदींना अधीन राहून, अभ्यास मंडळ त्याच्या सदस्यांमधून एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करील :

परंतु, अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष म्हणून निवडून द्यावयाचा सदस्य हा, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता मिळालेला व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा अध्यापक असेल ; आणि त्यानंतर पुढील व्यक्तींना स्वीकृत करून घेईल–

(दोन) इतर विद्यापीठातील एक प्राध्यापक ; आणि

(तीन) पुढीलप्रमाणे चार तज्ज्ञ व्यक्ती, जी,—

**(क)** राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा परिसंस्थांतील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा उद्योग यांमधील सहायक संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारी व्यक्ती किंवा मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्या विषयातील किमान एक संदर्भ पुस्तक किंवा तीन संशोधन प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत अशा संबंधित क्षेत्रामधील तज्ज्ञ आहे ;

**(ख)** त्या विषयातील नामवंत विद्याव्यासंगी ;

**(ग)** विषयाशी संबंधित उद्योगामधील किंवा व्यावसायिक संस्थांमधील नामवंत व्यक्ती ;

**(घ)** विषयाशी संबंधित उद्योगामध्ये किमान दहा वर्षे कामाचा अनुभव किंवा विषयाशी संबंधित उद्योगाचा मालक किंवा सल्लागार किंवा संयंत्रणा याचा अनुभव असणारी व्यक्ती ;

(ङ) आधीच्या वर्षीच्या अंतिम वर्ष पदवी परीक्षेतील आणि अंतिम वर्ष पदव्युत्तर परीक्षेतील संबंधित विषयातील अव्वल क्रमांक असलेल्या व्यक्तीला एक वर्षासाठी त्या विषयाचा अथवा त्या विषयाच्या गटाचा अभ्यासक्रम तयार करणे किंवा त्यात सुधारणा करणे यावरील चर्चेसाठी निमंत्रित सदस्य म्हणन घेणे.